ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३७ • शनिवार दि.३१ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

सिंहस्थ कुंभमेळा पर्वाचा शुभारंभ ; राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा

नाशिक : कुंभनगरी नाशिकमध्ये आज (शनिवार) पासून ऐतिहासिक सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नाशिकमधील रामकुंडावर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्तावर ऐतिहासिक ध्वजारोहण करण्यात आले. दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी ऐतिहासिक कुंभमेळा पर्वाला सुरूवात झाली.

ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व असलेल्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वर म्हणजेच त्र्यंबक नगरीत आता अधिकृत सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनेत्रा पवार, श्रृंगेरी पिठाचे शंकराचार्य शिवाय १३ आखाड्यांच्या महंतांची प्रमुख उपस्थिती होती. कुंभपर्वाचा आरंभ करण्यासाठी ध्वजारोहण सोहळ्यासाठी वर्षभरापासून नाशिकमध्ये विकासकामांचा धडाका सुरू होता. तर दोन दिवसांपासून नाशिकसह आणि त्र्यंबकेश्वर ध्वजारोहण सोहळ्यासाठी सजवायला सुरूवात झाली होती. गोदावरीकाठ परिसर, मंदिरे फुलांनी तसेच आकर्षक विद्युत रोषणाईमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. अवघी नाशिक नगरी झेंडे आणि पताकांनी भगवेमय करण्यात आली आहे. यावेळी ध्वजारोहण सोहळ्यासाठी रामकुंडवर ५१ फूट उंचीचा मुख्य धर्मध्वजस्तंभ उभारण्यात आला आहे. यासाठी पंचधातूंचा वापर करण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्त तीर्थावर तब्बल ३१ फूट उंचीचा मुख्य ध्वजस्तंभ उभारला आहे. या स्तंभाला ६२ किलो पितळाचा मुलामा आहे. दोन्ही ध्वजारोहण सोहळे एकाचवेळी करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नाशिकमधून (रामकुंड) आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्र्यंबकेश्वरमधून (कुशावर्त) उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शंकराचार्यांनी कुशावर्त कुंडात स्थान केले. प्रति कुशावर्त अशी ओळख असलेल्या श्रीचंद्र घाटावरही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुशावर्तावर ध्वजारोहण केल्यानंतर मुख्यमंत्री श्रीचंद्र घाटावर गेले होते.

नाशिक मधील ध्वजारोहणानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्र्यंबकेश्वरला जाऊन कुशावर्त ध्वजस्तंभाची पूजा केली आहे. राष्ट्रपतीच्या उपस्थितीतीमुळे भाविकांनी त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, नाशिकचे पालकमंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यासह इतर मान्यंवर, साधु-संत तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळा हा पुढच्या वर्षापर्यंत चालू राहणार असून लाखो भाविक नाशिकमध्ये दाखल होणार आहेत.

माकडछाप,कुत्रा,सरडा...भाजप-शिवसेना नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध पेटले

धंगेकर आणि नवनाथ बन यांच्यात आरोप-प्रत्यारोपांची मालिका

मुंबई/प्रतिनिधी-विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निकालानंतर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील राजकीय मतभेद चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. दोन्ही पक्षांतील नेत्यांकडून एकमेकांवर टीका करण्याचे सत्र सुरूच असून, आता या वादाला वैयक्तिक टीकेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन आणि शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्यातील शाब्दिक

संघर्षाने राजकीय वातावरण तापले आहे. एकमेकांना 'माकडछाप', 'कुत्रा' आणि 'सरडा' अशा शब्दांत प्रत्युत्तर दिल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद पुन्हा चर्चेत आले आहेत.

शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी राज्यातील नेतृत्वबदलाची मागणी केल्यानंतर भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी धंगेकर यांच्यावर टीका करत त्यांचा 'माकडछाप' असा उल्लेख केला. याला प्रत्युत्तर देताना धंगेकर यांनी बन हे पगारी माणूस असल्याचे सांगत त्यांच्या टीकेला आपण महत्त्व देत नसल्याचे स्पष्ट केले.वाद एवढ्यावरच थांबला नाही. शनिवारी (३१ ऑक्टोबर) धंगेकर यांनी समाजमाध्यमांवर भाजप कार्यालयाबाहेरील कुत्र्याचा फोटो प्रसिद्ध करत नवनाथ बन यांच्यावर बोचरी टीका केली. या पोस्टमधून त्यांनी बन यांना उद्देशून आक्षेपार्ह शब्दांचा वापर केला. त्यानंतर नवनाथ बन यांनीही समाजमाध्यमांवर प्रत्युत्तर देताना 'काय म्हणतात पुणेकर, रंग बदलू धंगेकर!' असा टोला लगावला. तसेच धंगेकर यांचा उल्लेख सरड्याच्या प्रतिमेतून करत टीकेला

पान ४ वर

कुरिअरच्या पार्सलचा भीषण स्फोट;दोन जण गंभीर जखमी

लातूर:शहरातील उमाटे कुरिअर्स येथे शनिवारी (३१ ऑक्टोबर) सकाळी सुमारे दहाच्या सुमारास कुरिअरच्या पार्सलचा भीषण स्फोट झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या पार्सलची टेम्पोतून उतरवणी सुरू असताना अचानक एका बॉक्समध्ये स्फोट झाला. या घटनेत दोन तरुण जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

दरम्यान, या स्फोटामागील प्राथमिक कारण समोर आले असून एअर पिस्तूलमध्ये वापरल्या जाणाऱ्या कार्बन डायऑक्साइड २ गॅसच्या कार्टेजचा स्फोट झाल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. नेहमीप्रमाणे कुरिअरच्या टेम्पोतून आलेली पार्सल उतरवण्याचे काम सुरू असताना अचानक मोठा आवाज झाला आणि एका पार्सलचा स्फोट झाला. या स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. स्फोटाची तीव्रता लक्षात घेता फॉरेन्सिक पथक, दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि विविध तपास यंत्रणांनाही पाचारण करण्यात आले.पोलिसांच्या प्राथमिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथून लातूरमध्ये एअर पिस्तूल विक्रीच्या दुकानासाठी काही एअर पिस्तूल कुरिअरच्या माध्यमातून पाठवण्यात आल्या होत्या. या पिस्तूलमध्ये वापरल्या जाणाऱ्या कार्बन डायऑक्साइड गॅसच्या कार्टेजमुळे स्फोट झाला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

न्यायालयीन कर्मचारी ५ नोव्हेंबर पासून सामुहिक रजेवर

नांदेड/प्रतिनिधी-उच्च न्यायालयातील कर्मचा-यांप्रमाणे समान काम समान वेतनमिळावे या प्रमुख मागणीसाठी १६ सप्टेबर पासुन टप्प्याटप्प्याने सुरु असलेले राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन आता निर्णायक टप्प्यावर येवून पोहचले असून अद्यापही मागणी मंजुर झाली नसल्याने ५ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्हयातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांसह राज्यातील ३४ हजार न्यायीक कर्मचारी हे सामुहिक रजेवर जाणार असल्यामुळे राज्यातील संपुर्ण न्यायव्यवस्था ठप्प होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने मागील दोन वर्षापासून राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालतील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतनश्रेणी लागु व्हावी याकरिता शासनाकडे विविध मार्गाने अविरतपणे पाठपुरावा लावुन धरला असून शासनाकडुन अद्याप कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नाही. सनदशीर मार्गाचा अवलंब करुन देखील आजवर न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा प्रश्न निकाली निघाला नसल्यामुळे राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शासनाविरुध्द आंदोलन पुकारले असून परिणामी सर्व न्यायालयीन कर्मचारी हे ५ नोव्हेंबर रोजी सामुहिक रजेवर जाणार आहेत. यामुळे राज्यातील न्यायव्यवस्थेचे कामकाज विस्कळित होण्याचा अंदाज आहे. यापुर्वीच मा. उच्च न्यायालयाने दोन न्यायमुर्तीची विशेष समिती गठित केली होती सदरील समितीने दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांना देखील मा. उच्च न्यायालयातील कर्मचा-यांप्रमाणे समान वेतन देण्यात यावे या बाबतचा अहवाल शासनाकडे पाठविला आहे. तरीदेखील शासन याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करित नसल्यामुळे हा उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान नव्हे का? असा प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. या आंदोलनाला सर्वपक्षीय लोकप्रतिनिर्धीनी पाठिंबा दिला आहे. महासंघाचे अध्यक्ष दिगंबर निकम ५ नोव्हेंबर पासुन नाशिक येथे आमरण उपोषणास बसणार आहेत व सेवानिवृत्त कर्मचारी हे पुन्हा साखळी उपोषणास बसणार असल्यामुळे आता शासन नेमकी काय भूमिका घेईल याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

भाजपचे प्रदेश संघटन मंत्री अजयजी जम्वाल यांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली असता त्यांचे खा.अशोक चव्हाण यांच्या हस्ते पं.दिनदयाल उपाध्याय यांची प्रतिमा भेट देवून सत्कार केला. यावेळी प्रदेश सहसंघटन मंत्री सतीश धोंड, खा.डॉ.अजित गोपछडे, रवीजी अनासपुरे, जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, प्रदेश उपाध्यक्ष ॲड.चैतन्य देशमुख, सौ.अनिताताई चोंडीकर, धनंजय कुलकर्णी यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

विकासकामांवरून आरोप-प्रत्यारोप;माहूरात निवडणुकीपूर्वीच राजकीय वातावरण तापले

विकास कामावर भर,नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा दावा

माहूर/प्रतिनिधी-धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेल्या माहूर नगरीच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी आपल्या साडेसात वर्षांच्या कार्यकाळात विविध विकासकामांवर भर दिल्याचे सांगितले जात आहे. शहरातील रस्ते, गटारी, पाणीपुरवठा, वृक्षारोपण, स्मशानभूमी परिसर, बुद्धभूमी येथील मंडप तसेच भोजनभट्टी तलावाच्या सुशोभीकरणासह विविध मूलभूत सुविधांची कामे करण्यात आली आहेत. शहराच्या

विकासासोबतच सार्वजनिक सुविधांच्या विस्तारासाठीही प्रयत्न करण्यात आल्याचा दावा नगराध्यक्षांकडून करण्यात आला आहे.

माहूर शहरातील काही अरुंद रस्ते ३० फूट रुंदीचे करण्याचा निर्णय घेऊन विकासकामांना गती देण्यात आली. गटारी आणि सांडपाण्याच्या निचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. बुद्धभूमी परिसराचा विकास, सभामंडप व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. हिंदू आणि मुस्लिम समाजाच्या स्मशानभूमींची स्वच्छता तसेच तेथे आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात येत असून, हरित माहूरची संकल्पना पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. पैनगंगा नदीतील पाणीसाठा वाढविण्यासाठी माहूर परिसरात कच्चा बंधारा उभारण्यात आला आहे. या बंधाऱ्यात अधिक काळ पाणी टिकून राहावे आणि साठवण क्षमता वाढावी, यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे नगराध्यक्षांनी सांगितले. दरम्यान, आगामी माहूर नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विकासकामांवरून राजकीय वातावरण तापू लागले आहे. झालेल्या कामांवर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात असून, विविध तक्रारी आणि चौकशीच्या मागण्यांमुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. मात्र, विकासकामांबाबत निरर्थक आरोप करून आपली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांनी केला आहे. काही व्यक्तींकडून सातत्याने तक्रारी करून चौकशीचा ससेमिरा लावला जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.वास्तविकता वेगळी असून प्रशासनातील अधिकाऱ्यांना, विकास प्रेमी लोकप्रतिनिधी ना आणि माहूर करांना सर्व हकीकत ज्ञात आहे. अशा तक्रारीना आणि आरोपांना आपण भीक घालत नाही. विकासकामांच्या देखभाली बरोबरच

पान ४ वर

क्षुल्लक कारणावरुन दोन जणांवर प्राणघातक हल्ला

नांदेड/प्रतिनिधी-मोटरसायकल घासल्याच्या कारणावरुन दोन जणांवर तलवारीने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना गुरुवारी सकाळी रहेमतनगर येथे घडली आहे.

शेख जमीर शेख जावेद व त्याचा मित्र सोहेलखान हे दोघेजण गुरुवारी सकाळी दुचाकीवर जात असतांना रहेमतनगर येथील उमर मटन शॉप समोर मोटरसायकल घासल्याच्या कारणावरुन करीमखान गौसखान यांच्यासोबत वाद झाला. वादाचे पर्यावसन हाणामारीच्या घटनेत घडले. करीमखान गौसखान, अबु जलील खान गौसखान, असलमखान गौसखान, अमनखान गौसखान यांनी तलवारी व खंजरने शेख जमीर व सोहेलखान यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी शेख जमीर शेख जावेद यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार देशमुख हे करीत आहेत.

विकासाच्या नावाखाली निसर्गाची कत्तल!

विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी देण्याची प्रक्रिया थांबण्याचे नाव घेत नाही. रस्ते, महामार्ग, औद्योगिक प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प आणि धार्मिक पर्यटनाच्या सुविधांसाठी जंगलांवर कुऱ्हाड चालवली जात आहे. नाशिकमध्ये आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवनातील वृक्षतोडीचा निर्माण झालेला वाद आणि भीमाशंकर अभयारण्यालगत कर्जत तालुक्यातील सैदोंगर परिसरात जलविद्युत प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडण्याचा विषय, या दोन्ही घटना विकासाच्या नावाखाली पर्यावरणाला किती दुय्यम स्थान दिले जाते, हे अधोरेखित करणाऱ्या आहेत. नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी साधुग्राम उभारण्याच्या नियोजनातून तपोवनातील सुमारे १,७०० ते १,८०० झाडे तोडण्याचा प्रस्ताव पुढे आला. या वृक्षतोडीविरोधात नाशिककरांनी आंदोलन केले. पर्यावरणप्रेमी नागरिकांनी न्यायालयीन लढाही दिला. राष्ट्रीय हरित लवादाने वृक्षतोडीला स्थगिती दिल्यानंतर झाडे न तोडता साधुग्राम उभारण्याची भूमिका महापालिकेने घेतली. धार्मिक सोहळ्याच्या नियोजनासाठी पर्यावरणाचा बळी देण्याची गरज नाही, हे या संघर्षातून स्पष्ट झाले. मात्र असा पर्याय सुरुवातीपासूनच का स्वीकारला गेला नाही, हा प्रश्न अनुत्तरित आहे. दुसरीकडे भीमाशंकर अभयारण्या-लगतच्या रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सैदोंगर येथे टोरंट पॉवरचा तीन हजार मेगावॅट क्षमतेचा पंप्ड स्टोरेज जलविद्युत प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनक्षेत्र वळते करण्यात आले असून ३२ हजार ४९० झाडे तोडण्यास मंजुरी मिळाल्याचे वृत्त आहे. यापैकी काही झाडांची तोडही करण्यात आली आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमी, स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. वनविभागाने अभयारण्याच्या हद्दीत अवैध वृक्षतोड होत नसल्याचे स्पष्ट केले असले, तरी अभयारण्या-लगतच्या जंगलावर होणाऱ्या परिणामांचा प्रश्न कायम आहे.या प्रकल्पाच्या समर्थनार्थ स्वच्छ ऊर्जा निर्मिती, विजेची साठवणूक आणि भविष्यातील ऊर्जेची गरज भागविण्याचा युक्तिवाद केला जात आहे. ऊर्जा क्षेत्राच्या दृष्टीने अशा प्रकल्पांची गरज असू शकते. मात्र स्वच्छ ऊर्जेच्या निर्मितीसाठी नैसर्गिक जंगलांचा विनाश करणे कितपत योग्य आहे? पंप्ड स्टोरेज प्रकल्पातून ऊर्जा व्यवस्थापनाला मदत होणार असेल, तरी त्यासाठी निवडलेली जागा, वनक्षेत्रावरील परिणाम आणि जैवविविधतेचे नुकसान यांचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. विकासाची गरज आणि पर्यावरणाचे संरक्षण यांच्यात समतोल राखणे ही सरकारची जबाबदारी आहे.भीमाशंकरचा परिसर पश्चिम घाटाच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील पट्ट्याचा भाग आहे. या परिसरातील जंगलांमध्ये शेकरूसारख्या दुर्मीळ वन्यजीवांचा अधिवास आहे. अनेक प्राणी, पक्षी, औषधी वनस्पती आणि जलस्रोतांचे अस्तित्व या जंगलांवर अवलंबून आहे. जंगलातील वृक्षतोड ही केवळ झाडे कमी होण्याची घटना नसते. त्यातून संपूर्ण परिसंस्थेचे संतुलन बिघडण्याची शक्यता असते. डोंगर उतारावरील वृक्षराजी कमी झाली तर मातीची धूप, पाण्याचा प्रवाह आणि नैसर्गिक जलस्रोतांवरही परिणाम होऊ शकतो. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये अशा परिणामांकडे दुर्लक्ष करणे भविष्यात महागात पडू शकते.झाडे तोडून त्याबदल्यात हजारो किंवा लाखो रोपे लावण्याची आश्वासने दिली जातात. परंतु शंभर वर्षे जुने जंगल आणि नव्याने लावलेली रोपे यांची तुलना होऊ शकते का? जंगल म्हणजे केवळ लाकूड किंवा झाडांची संख्या नाही. ती एक जिवंत परिसंस्था आहे, तिचे रक्षण केले पाहिजे. प्रकल्पामुळे रोजगार आणि ऊर्जा निर्मिती होणार असेल, तर त्याचे फायदे महत्त्वाचे आहेत; परंतु त्यासाठी निसर्गाला मोजावी लागणारी किंमतही जनतेसमोर आली पाहिजे.एकीकडे पर्यावरण संवर्धनाचे कार्यक्रम राबवायचे, वृक्षलागवडीचे उत्सव साजरे करायचे आणि दुसरीकडे हजारो झाडे तोडण्यास परवानग्या द्यायच्या, हा विरोधाभास संपला पाहिजे. नाशिकमधील कुंभमेळा असो किंवा भीमाशंकर परिसरातील ऊर्जा प्रकल्प, विकासाचे नियोजन निसर्गाला केंद्रस्थानी ठेवून झाले पाहिजे. अन्यथा उद्या विकासाच्या नावाने उभारलेल्या इमारती, रस्ते आणि प्रकल्प असतील; पण त्यांना जीवन देणारे जंगलच शिल्लक राहणार नाही. विकास माणसासाठी आहे, माणूस विकासासाठी नाही. आणि माणसाचे अस्तित्वच निसर्गावर अवलंबून असेल, तर निसर्गाचा विनाश करून साधलेला विकास कोणाच्या हिताचा? कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये वृक्षतोडीचा वाद, भीमाशंकर परिसरात ऊर्जा प्रकल्पासाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड; विकासाच्या संकल्पनेत पर्यावरणाला स्थान कधी मिळणार?

राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल!



भारताची विविधता हीच भारताची ताकद आहे. भाषा वेगवेगळ्या, संस्कृती वेगवेगळ्या, परंपरा वेगवेगळ्या; धर्म वेगवेगळे मात्र देश एक आहे. ही एकात्मता केवळ भावनिक पातळीवर टिकवून ठेवायची नसते, तर त्यासाठी दूरदृष्टी, संघटन कौशल्य, बंधुता, निर्णयक्षमता आणि प्रसंगी कठोर भूमिका घेण्याची तयारीही आवश्यक असते. भारताच्या इतिहासात या गुणांचा प्रभावी प्रत्यय देणारे नेतृत्व म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल. म्हणूनच त्यांची जयंती ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकता दिवसाची सुरुवात कधी झाली भारत सरकारने २०१४ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी केंद्र शासनाने या निर्णयाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या आयोजनासंदर्भात अधिकृत प्रसिद्धिपत्रक जारी केले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी एका आदेशाद्वारे त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करताना राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचे निर्देशित केले आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध, नाटीका, व्याख्याने, आयोजित करण्याचे स्पष्ट केले आहे. सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान आणि स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण करून भारताची एकात्मता दृढ करण्यासाठी केलेले ऐतिहासिक कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता. या दिवशी रन फॉर युनिटी, राष्ट्रीय एकतेची शपथ आणि संचलन यांसारख्या उपक्रमांद्वारे देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याचा संदेश दिला जातो. म्हणजेच हा दिवस केवळ एका महान नेत्याच्या स्मरणाचा नसून, राष्ट्राच्या एकात्मतेप्रती आपली जबाबदारी पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नातून घडलेले नेतृत्व

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील नडियाद येथे जन्मलेल्या वल्लभभाई पटेल यांनी वकिलीच्या क्षेत्रात यश मिळवले होते. मात्र महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव आणि देशाच्या स्वातंत्र्याची ओढ यामुळे त्यांनी सार्वजनिक जीवनाचा मार्ग स्वीकारला. १९१८ मधील खेडा सत्याग्रह हा त्यांच्या नेतृत्वाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे महसूल भरणे कठीण झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी संघटित लढा उभारला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना एकत्र आणणे आणि संयमाने संघर्ष पुढे नेणे, ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये या आंदोलनातून स्पष्ट झाली. निडर, निर्भय व बाणेदार नेतृत्व म्हणून ते हळूहळू राष्ट्रव्यापी झाले. १९२८ मधील बारडोली सत्याग्रहाने त्यांच्या नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली. महसुलातील वाढीव आकारणीविरोधात शेतकऱ्यांनी एकजूट दाखवली. पटेल यांनी या आंदोलनाचे प्रभावी संघटन केले. शिस्तबद्ध, ठाम आणि अहिंसक संघर्षाच्या बळावर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्याच्या या लढ्यामुळे त्यांना सरदारही उपाधी प्राप्त झाली. ही उपाधी त्यांना शेतकऱ्यांनी दिली. सरदार म्हणजे समूहाचा प्रमुख,नेता,नेतृत्व, मान्यता मिळालेला आदराचा माणूस त्यामुळे सरदार ही उपाधी केवळ सन्मानाची नव्हती; ती जनतेने त्यांच्या नेतृत्वावर दाखवलेल्या विश्वासाची पावती होती.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर

जनसेवेपासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंत

अहमदाबाद नगरपालिकेतील त्यांच्या कार्यातून प्रशासनाकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टी दिसून आली. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. सार्वजनिक पद म्हणजे अधिकार गाजवण्याचे साधन नसून, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कामातून दिसतो. पुढे या अहमदाबाद नगर पालिकेचा अध्यक्ष देशाचा लोहपुरुष म्हणून नावलौकिकास आला. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आणि १९४२ च्या भारत छोडो आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. संघटन कौशल्य, निर्णयक्षमता आणि जनतेला एकत्र आणण्याची क्षमता या गुणांच्या बळावर ते राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक बनले.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक जबाबदारी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण स्वातंत्र्य मिळाले म्हणजे देशाची राजकीय एकात्मता पूर्ण झाली, असे नव्हते. त्या वेळी ब्रिटिश भारताबरोबरच ५६० हून अधिक संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर या संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला. अनेक संस्थानांचे स्वतंत्र राहण्याचे किंवा भारत-पाकिस्तान यांपैकी एखाद्या देशात सामील होण्याचे पर्याय विचाराधीन होते. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय विभाजन टाळणे, हे नव्या नेतृत्वापुढील मोठे आव्हान होते. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून सरदार पटेल यांनी संस्थानांच्या विलीनीकरणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. व्ही. पी. मेनन यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी संस्थानिकांशी चर्चा, समजूत, मुत्सद्देगिरी आणि परिस्थितीनुसार ठाम प्रशासकीय निर्णय यांचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वामुळे विविध संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्याची प्रक्रिया पुढे गेली. हे काम केवळ राजकीय करारांचे नव्हते; भारताच्या भविष्यातील भौगोलिक अखंडतेचा आणि प्रशासनाच्या स्थैर्याचा तो पाया होता.

जुनागढ आणि हैदराबाद : निर्णयक्षमतेची कसोटी

जुनागढच्या संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या भौगोलिक आणि राजकीय हितांचा विचार करून पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. पुढे हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरला. वाटाघाटी आणि प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने सप्टेंबर १९४८ मध्ये ऑपरेशन पोलो ही पोलीस कारवाई करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. या घटनांमधून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर त्यांनी मुत्सद्देगिरीसोबतच आवश्यक तेव्हा कठोर निर्णय घेण्याची तयारीही दाखवली. संस्थानांच्या विलीनीकरणाबरोबरच स्वतंत्र भारताची प्रशासकीय चौकट सक्षम करण्यावरही पटेल यांनी भर दिला. अखिल भारतीय सेवांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. देशाच्या विविध भागांत प्रशासनाची सातत्यपूर्ण आणि समन्वयित यंत्रणा कार्यरत राहणे, हे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती.

एकसंघ भारताची पायाभरणी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर भारतासमोर केवळ परकीय सत्तेतून मुक्त होण्याचे आव्हान नव्हते; तर अनेक संस्थाने, विविध राजकीय हितसंबंध आणि अनिश्चित भविष्य यांना एकाच राष्ट्रीय चौकटीत आणण्याचेही आव्हान होते. अशा निर्णायक काळात सरदार वल्लभभाई पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, धैर्य आणि ठाम निर्णयक्षमतेच्या बळावर संस्थानांच्या विलीनीकरणाला गती दिली. त्यामुळे आधुनिक भारताच्या राजकीय एकात्मतेचा पाया अधिक भक्कम झाला. आज आपण एकसंध भारताचे नागरिक म्हणून अभिमानाने उभे आहोत, त्या ऐतिहासिक प्रक्रियेत सरदार पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करणे, हा इतिहासाचा गौरव करण्याबरोबरच भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या संकल्पाचे नूतनीकरण करण्याचा दिवस आहे.

माणसं ऑनलाइन,नाती मात्र ऑफलाइन!

आजच्या आधुनिक जगात माणसाच्या हातात स्मार्टफोन आला, जगाशी जोडले जाण्याची साधने आली; परंतु दुर्दैवाने माणसामाणसांतील संवाद मात्र कमी होत चालला आहे.एका क्लिकवर हजारो मैलांवरील व्यक्तीशी संपर्क साधता येतो, पण घरात समोर बसलेल्या माणसाशी दोन प्रेमाचे शब्द बोलण्यासाठी वेळ मिळत नाही, ही आजच्या समाजजीवनातील विसंगती आहे.

मोबाइलच्या छोट्याशा पडद्यावर संपूर्ण जग सामावले आहे; पण त्याच पडद्यामुळे आपल्या घरातील माणसांचे चेहरे, त्यांच्या भावना आणि त्यांच्या मनातील प्रश्न दुर्लक्षित होत आहेत. घरात चार माणसे एकत्र बसलेली असतात, पण प्रत्येकाचे लक्ष वेगवेगळ्या मोबाइलमध्ये गुंतलेले असते. संवाद संपतो, शांतता वाढते आणि नात्यांमधील जिव्हाळा हळूहळू कमी होऊ लागतो.आज सोशल मीडियावर आनंदाचे क्षण प्रदर्शित करण्याची स्पर्धा सुरू आहे.वाढदिवस, विवाहसोहळे, सहली, सण आणि कौटुंबिक कार्यक्रमांचे फोटो मोठ्या उत्साहाने प्रसारित केले जातात. शेकडो शुभेच्छा मिळतात, लाइक्सचा वर्षाव होतो; परंतु एखाद्या व्यक्तीच्या दुःखाच्या वेळी तिच्या जवळ बसून धीर देणारे किती जण असतात?आभासी जगातील गर्दी आणि प्रत्यक्ष जीवनातील एकाकीपणा यातील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे.विशेषतः वृद्ध व्यक्तींच्या जीवनात ही समस्या अधिक प्रकर्षाने जाणवते. मुलांच्या शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्यभर कष्ट करणारे आई-वडील वृद्धापकाळात मुलांच्या सहवासासाठी आसुसलेले असतात. त्यांना महागड्या भेटवस्तूंपेक्षा दोन क्षणांचा संवाद, प्रेमाने विचारलेली विचारपूस आणि आपलेपणाची जाणीव अधिक मोलाची वाटते. मात्र अनेकदा त्यांच्या वाट्याला येते ती एकाकी शांतता.दुसरीकडे, तरुण पिढीही डिजिटल जगाच्या आकर्षणात मानसिक ताण, तुलना आणि असुरक्षिततेचा सामना करीत आहे. इतरांचे यश, आनंद आणि झगमगाट पाहून स्वतःच्या आयुष्याबद्दल न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता वाढते. प्रत्यक्ष जीवनातील साधेपणा आणि आभासी जगातील कृत्रिम चमक यांची तुलना करताना अनेकजण स्वतःच्या आनंदापासून दूर जातात.याचा अर्थ तंत्रज्ञान वाईट आहे, असा मुळीच नाही. तंत्रज्ञान हे माणसाच्या प्रगतीचे प्रभावी साधन आहे.त्याचा वापर ज्ञान, शिक्षण, आरोग्य, संवाद आणि सामाजिक परिवर्तनासाठी झाला पाहिजे.मात्र साधनाने माणसावर वर्चस्व गाजवू नये.मोबाइल आपल्या हातात असावा, पण आपल्या आयुष्याचा आणि नात्यांचा ताबा त्याने घेऊ नये.

पंडित पवळे
शिक्षणयोगी,नांदेड

आज प्रत्येक कुटुंबाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहेआपण आपल्या माणसांसाठी खरोखर वेळ देतो आहोत का? घरात जेवताना मोबाइल बाजूला ठेवणे, मुलांशी मनमोकळा संवाद साधणे, वृद्धांच्या अनुभवांना कान देणे, मित्रांची प्रत्यक्ष भेट घेणे आणि गरजू व्यक्तीच्या दुःखात सहभागी होणे, या छोट्या कृती नात्यांना नवसंजीवनी देऊ शकतात.समाजातील माणुसकी टिकविण्यासाठी मोठ्या आंदोलनांची किंवा भव्य उपक्रमांचीच गरज नसते. कधी एखाद्या एकाकी वृद्धाची विचारपूस, निराश मित्राला दिलेला आधार, शेजाऱ्याच्या अडचणीत केलेली मदत किंवा कुटुंबातील सदस्यासोबत घालवलेला संवाद हीच खरी सामाजिक बांधिलकी ठरते. आजच्या काळात माणसाला जोडणारे तंत्रज्ञान वाढले आहे; पण माणसाला समजून घेणारी संवेदना कमी होऊ नये. संपर्कांच्या यादीत हजारो नावे असण्यापेक्षा संकटाच्या वेळी सोबत उभे राहणारे चार माणसे असणे अधिक महत्त्वाचे आहे.

शेवटी, आधुनिकतेचा खरा अर्थ केवळ डिजिटल प्रगती नसून मानवी नात्यांची समृद्धी हा आहे. जगाशी जोडले जाताना आपल्या माणसांपासून तुटू नये. कारण मोबाइलची बॅटरी संपली तर चार्ज करता येते; पण नात्यांमधील जिव्हाळा संपला तर तो पुन्हा निर्माण करण्यासाठी कधी कधी संपूर्ण आयुष्यही अपुरे पडते.माणसं ऑनलाइन जोडली जात असताना नाती ऑफलाइन तुटू नयेत, हीच आजच्या समाजाची खरी गरज आहे.

अल निनोच्या पार्श्वभूमीवर चारा व्यवस्थापनाचे नियोजन

नांदेड/प्रतिनिधी-एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे उद्भवू शकणाऱ्या चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुधनाकरिता वर्षभर सकस चारा उपलब्ध व्हावा, तसेच जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी मृदासंवर्धन आणि संतुलित खत वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी, नांदेड-२ येथे विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात १०३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याच्या वितरणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर चारा प्रक्रिया व साठवणूक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कृषि विज्ञान केंद्राचे पशुविज्ञान विषय विशेषज्ञ डॉ.निहाल मुल्ला यांनी वाळलेल्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे आणि त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून समजावून सांगितले. तसेच हंगामात उपलब्ध होणाऱ्या हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार केल्यास टंचाईच्या काळातही पशुधनासाठी सकस चारा उपलब्ध ठेवता येतो, असे त्यांनी सांगितले.केंद्र शासनाच्या खेत बचाओ अभियानांतर्गत जमिनीचे आरोग्य जपणे, मृदासंवर्धनाच्या उपाययोजना राबविणे आणि माती परीक्षणानुसार संतुलित खतांचा वापर करणे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

हदगाव तालुक्यात खाद्यपदार्थांसाठी तळीव तेलाचा वारंवार वापर

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरासह तालुक्यातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांमध्ये खाद्यपदार्थ तळण्यासाठी वापरलेल्या तेलाचा वारंवार पुनर्वापर होत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. एकदा वापरलेले तेल पुन्हा पुन्हा गरम करून खाद्यपदार्थ तयार केले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, या प्रकारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनाकडून प्रभावी तपासणी आणि कारवाई होत आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

जळलेल्या तेलाच्या पुनर्वापरामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. हॉटेल आणि ढाब्यांमध्ये भजी, वडे, समोसे तसेच इतर तळलेले पदार्थ तयार करण्यासाठी तेलाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र, खर्च कमी करण्यासाठी काही ठिकाणी एकाच तेलाचा वारंवार वापर केला जात असल्याची तक्रार आहे. तेल वारंवार उच्च तापमानाला गरम केल्याने त्याच्या रासायनिक गुणधर्मांमध्ये बदल होऊ शकतात. अशा तेलाचे नियमित सेवन आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे खाद्यतेलाच्या वापराबाबत अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. वापरलेल्या तेलाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाने नियम व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित

केली आहेत. तेलाची गुणवत्ता निर्धारित मर्यादेपेक्षा कमी झाल्यास त्याचा खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापर टाळणे आवश्यक आहे. मात्र, हदगाव शहर आणि तालुक्यातील खाद्यपदार्थ विक्रीच्या ठिकाणी या नियमांचे पालन होते की नाही, याची नियमित तपासणी केली जाते का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. शेकडो हॉटेल-ढाबे शहरासह तालुक्यात अनेक हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि ढाबे आहेत. अशा ठिकाणी वापरल्या जाणाऱ्या तेलाच्या गुणवत्तेची तपासणी, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई आणि व्यावसायिकांमध्ये जनजागृती करणे ही संबंधित यंत्रणेची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, प्रत्यक्षात तपासणी किती वेळा होते, किती व्यावसायिकांची तपासणी करण्यात आली आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास किती जणांवर कारवाई झाली, याबाबत स्पष्ट माहिती समोर येण्याची गरज आहे.नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड कशासाठी खाद्यपदार्थांची चव आणि दर्जा यापेक्षा खर्चाला प्राधान्य दिले जात असेल, तर हा प्रकार गंभीर मानला पाहिजे. शालेय विद्यार्थी, तरुण, कामगार आणि सर्वसामान्य नागरिक दररोज हॉटेलमधील खाद्यपदार्थांचे सेवन करतात. त्यामुळे वापरलेल्या तेलाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही हलगर्जी नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. हदगाव शहर व तालुक्यातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि ढाब्यांची विशेष तपासणी मोहीम राबवून वापरल्या जाणाऱ्या तेलाच्या गुणवत्तेची पडताळणी करावी, नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी आणि तपासणीचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता अन्न व औषध प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे किती गांभीर्याने लक्ष देते आणि नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवारी नांदेड दौऱ्यावर

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, दि.१ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

रविवारी दुपारी १ वाजता मुंबई विमानतळ येथून विमानाने नांदेडकडे प्रयाण होईल. दुपारी १.४५ वाजता नांदेड विमानतळावर आगमन झाल्यानंतर ते मोटारीने वाडी (बु.) येथे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता उपजिल्हा रुग्णालय, वाडी (बु.) येथे आयोजित नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांच्या लोकार्पण व उद्घाटन सोहळ्यास ते उपस्थित राहतील.या कार्यक्रमात नवनिर्मित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे लोकार्पण, जिल्ह्यातील विविध रस्त्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी चारा वाटप, दुष्काळग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा शुभारंभ, गरजू महिलांना शिलाई यंत्रांचे आणि विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ४ वाजता मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील.

रेल्वेगेट बंद,पर्यायी मार्गावर गतिरोधकांचा अडथळा

गोकुंद्यात नागरिकांचा जीवघेणा प्रवास

किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा शहरात स्व.बाळासाहेब ठाकरे चौक ते आनंदवाडीपर्यंत लोकांनी मनमर्जीने घरासमोर गतीरोधकं तयार करून लोकांना वेठीस धरले आहे. किनवट शहराच्या संपर्कासाठी हा अत्यंत महत्वाचा पर्यायी एकमेव प्रमुख मार्ग असल्याने प्रचंड रहदारी असते. गरोदरमाता, वयोवृद्ध महिला-पुरुष, दिव्यांग, दुर्धर आजार पिडीतांसाठी या गतीरोधकांमुळे जीवघेणा प्रवास ठरु लागला आहे. जिल्हा परिषदेच्या स्थानिक प्रशासनाने तात्काळ गतिरोधक निर्मुलनाची कारवाई करण्याची नागरिकांची मागणी जोर धरली आहे.

राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील रेल्वेगेट हा रेल्वेच्या फेऱ्यांमुळे बहूतांश वेळा चालू-बंद होत असतो. अशा वेळी गोकुंदा शहरातील राष्ट्रीय महामार्गापासून किनवट, सुभाषनगर, दत्तनगर, सुभाषनगर आणि किनवट शहरांशी जोडलेला हा पर्यायी, एकमेव प्रमुख मार्ग असल्याचे सर्वज्ञात आहे. दरम्यान रस्त्यालगतच्या इमारती धारकांनी घरासमोर सार्वजनिक रस्त्यावर मोठमोठी सिमेंटचे गतिरोधकँ तयार केलीत. ती वृद्धवृद्धांना, आजारी व्यक्ती, गरोदरमाता, दिव्यांगाना वेदनादायी आणि जीवघेणी ठरणारी आहेत. कशासाठी या निमित्ताने लोकांना वेठीस धरताय ? असा नागरिकांचा सवाल आहे. दोन दिवसात गतिरोधक निर्मुलन न केल्यास संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा तीव्र विरोध इशारा दिला आहे. जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग किनवट प्रशासनाशी संपर्क साधला असता त्यांनी संबंधितांना नोटीस प्रक्रिया राबविली जाणार आहे. लोकांच्या भावना लक्षात घेऊन कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

दुष्काळमुक्त,विकसित नांदेडसाठी देशभरातील कंपन्यांचा पुढाकार

नांदेड/प्रतिनिधी-संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासह नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी देशभरातील कंपन्यांनी सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीच्या माध्यमातून सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. केअरींग फ्रेंड्स फाऊंडेशनने जिल्ह्याच्या विकासासाठी १ कोटी रुपयांचा, तर डायजीओ इंडिया लिमिटेडने मृद व जलसंधारणासाठी १० लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत ही सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. या कार्यशाळेत देशभरातील ५० हून अधिक कंपन्यांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचीही उपस्थिती होती. जिल्ह्याच्या प्राधान्यक्रमातील विकासकामांसाठी सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीचे प्रभावी नियोजन करणे आणि जिल्हा प्रशासन व कंपन्यांमध्ये दीर्घकालीन सहकार्य निर्माण करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. कार्यशाळेदरम्यान केअरींग फ्रेंड्स फाऊंडेशनने नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले. तसेच संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डायजीओ इंडिया लिमिटेडने १० लाख रुपयांचा निधी देण्याची तयारी दर्शविली. याशिवाय पुढील आर्थिक वर्षात जिल्ह्याच्या विकासात्मक गरजांनुसार मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले.

वाडी बु. येथील उपजिल्हा रुग्णालयाला पद्मश्री श्यामराव कदम यांचे नाव देण्याची मागणी सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेवून निवेदनाद्वारे केली. यावेळी खा.नागेश पाटील आष्टीकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, भगवानराव आलेगावकर, भुजंग पाटील, आनंद चव्हाण, हणमंत राजेगोरे, रंगनाथ वाघ, डॉ.हंसराज वैद्य, भगवान ढगे, तातेराव पाटील आलेगावकर, नानासाहेब पोहरे, रमेश पावडे यांच्यासह इतर उपस्थित होते.

दिवाळीपर्यंत रेशन दुकाने सातही दिवस १० तास सुरु ठेवा-आ.राजेश पवार

नायगाव/प्रतिनिधी-दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना त्यांच्या हक्काचे रेशन वेळेत व पूर्ण प्रमाणात मिळावे, यासाठी नायगाव विधानसभा मतदारसंघातील सर्व स्वस्त धान्य दुकाने दिवाळीपर्यंत आठवड्यातील सातही दिवस दररोज किमान १० तास सुरू ठेवण्याचे स्पष्ट निर्देश आ. राजेश संभाजी पवार यांनी नायगाव, उमरी व धर्माबाद या तिन्ही तालुक्यांच्या तहसीलदारांना दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दिवाळीच्या काळात गरीब व गरजू कुटुंबांना हक्काचे धान्य मिळवण्यासाठी रेशन दुकानांच्या वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असे आ. पवार यांनी स्पष्ट केले. दोन किंवा तीन गावांसाठी एकच रेशन दुकान असल्यास प्रत्येक गाव, वाडी व तांड्यावर स्वतंत्र धान्यवाटपाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेषतः बेलदरा, हातणी व अंधलापूरवाडी येथे गर्दी टाळण्यासाठी स्वतंत्र धान्यवाटप व्यवस्था तातडीने सुरू करण्याच्या सूचना उमरी तहसीलदारांना दिल्या आहेत.रेशन दुकानांमधील गर्दी व धान्यवाटप प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी आणि अन्य शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती

करावी. ई-पॉस मशीन किंवा इंटरनेटच्या तांत्रिक अडचणींमुळे धान्यवाटप थांबता कामा नये, यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, असेही त्यांनी सांगितले.धान्य उपलब्ध असतानाही वितरण न करणे, दुकान कमी वेळ सुरू ठेवणे किंवा लाभार्थ्यांची अडवणूक करणे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. नियमबाह्य वर्तन करणाऱ्या दुकानदारांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक गावासाठी स्वतंत्र स्वस्त धान्य दुकान मंजूर करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या आहेत. रेशन हा प्रत्येक पात्र लाभार्थ्याचा हक्क असून दिवाळीच्या काळात कोणत्याही गरीब कुटुंबाला धान्यासाठी त्रास सहन करावा लागू नये. नायगाव, उमरी व धर्माबाद तालुक्यांतील नागरिकांनी रेशन वितरणातील अनियमितता किंवा अडवणुकीबाबत प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन आ. राजेश संभाजी पवार यांनी केले आहे.

विशेष लोकअदालतीचे २१ नोव्हेंबरला आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये २१ नोव्हेंबर रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या विशेष लोकअदालतीमध्ये परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) संदर्भातील पात्र प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत.या अनुषंगाने संबंधित पक्षकारांना आपली प्रकरणे तडजोडीने मिटविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांसाठी संबंधित न्यायालयात, तर दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड किंवा जवळच्या तालुका न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून तडजोड करता येईल.

कोयता बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-कोयता घेवून फिरणाऱ्या एका इसमास गुरुवारी रात्री खोब्रागडेनगर येथे पोलीसांनी अटक केली आहे. निंबु टोपाजी मेटकर (वय २७) रा.जंगमवाडी हा गुरुवारी रात्री खोब्रागडेनगर परिसरात लोखंडी कोयता हातात घेवून संशयास्पदरित्या फिरत असतांना शिवाजीनगर पोलीसांनी त्यास अटक केली आहे.

जाहीर प्रगटन

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांच्या न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३१२/२०२६
शेख जिशान विरुद्ध म.न.पा.नांदेड

अर्जदारः- शेख जिशान पि.शेख रमजानी V/G असमा बेगम भ्र.शेख रमजानी वय ३० वर्ष धंदा घरकाम रा.साईनगर ता.नांदेड जि.नांदेड

गैरअर्जदारः- आयुक्त नांदेड वाघाळा महानगर पालिका,नांदेड

दावा :- जन्म नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार शेख जिशान पि.शेख रमजानी V/G असमा बेगम भ्र.शेख रमजानी वय ३० वर्ष धंदा घरकाम रा.साईनगर ता.नांदेड जि.नांदेड याने या न्यायालयात त्यांचे नामे शेख जिशान पि.शेख रमजानी यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने यांचा जन्म दिनांक १७/१२/२०२१ रोजी इतवारा,नांदेड येथे झाला असे नमुद केले आहे.

सदर अर्जदाराला शेख जिशान पि.शेख रमजानी यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ५/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
लिपीक फौजदारी विभाग
३ रे फौजदारी न्यायालय, नांदेड

स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड

जाहीर प्रगटन

३ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांच्या न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३९२/२०२६
विरुद्ध

अर्जदारः- संजय पि.बाबाराव रेंगे वय ४६ वर्ष धंदा मजुरी रा.रेणकापूर पो.हयातनगर ता.वसमत जि.हिंगोली

गैरअर्जदारः- ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत कार्यालय मरळक (बु.) ता.जि.नांदेड

दावा :- जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार संजय पि.बाबाराव रेंगे वय ४६ वर्ष धंदा मजुरी रा.रेणकापूर पो.हयातनगर ता.वसमत जि.हिंगोली याने या न्यायालयात त्यांची मुलगी नामे पूनम पि.संजय रेंगे यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने पूनम पि.संजय रेंगे हीचा जन्म दिनांक ०९/०४/२००८ रोजी मौजे मरळक (बु) ता.जि.नांदेड येथे झाला असे नमुद केले आहे.

सदर अर्जदाराला पूनम पि.संजय रेंगे यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ३०/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
लिपीक फौजदारी विभाग
३ रे फौजदारी न्यायालय, नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड

जाहीर प्रगटन

प्रपत्र-३

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार-अब्दुल राफे अब्दुल समद रा.धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड मो.बाळापुर ता.धर्माबाद गट क्र.३७५/C मधील ०१ हे.३२ आर महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ नुसार भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ.बाळापुर ता.धर्माबाद गट क्र.३७५/C मधील ०१ हे.३२ आर.ही जमीन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ चे कलम ३ (१) नुसार भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रक्रियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात केली जाणार नाहीत.

स्वाक्षरित/-
(अजय शिंदे)
उपजिल्हाधिकारी (सामान्य)
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **VAISHALI PRAVIN PATIL** which now I am, changing as (new name) **VAISHALI PRAVIN CHIKHALIKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
VAISHALI PRAVIN CHIKHALIKAR
R/o H.no.108, At post Chikhali Tq. Kandhar
Dist. Nanded-431714
Mob.no. 9923154777

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **PRATAPRAO VINODRAO PATIL** which now I am, changing as (new name) **PRATAPRAO GOVINDRAO CHIKHALIKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
PRATAPRAO GOVINDRAO CHIKHALIKAR
R/o H.no.108, At post Chikhali Tq. Kandhar
Dist. Nanded-431714
Mob.no. 9881414777

CHANGE IN NAME/SURNAME

My (old name) is **PRATIBHA PRATAPRAO PATIL** which now I am, changing as (new name) **PRATIBHA PRATAPRAO CHIKHALIKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
PRATIBHA PRATAPRAO CHIKHALIKAR
R/o H.no.108, At post Chikhali Tq. Kandhar
Dist. Nanded-431714
Mob.no. 9881414777

मुख्यमंत्री साहेब...शेतकऱ्यांना भीक नको,आत्महत्या करण्याची परवानगी द्या

काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद बाबागौड यांचे अनोखे आंदोलन

भोकर/प्रतिनिधी-चालू वर्षाचा खरीप हंगाम पावसा अभावी वाया गेला... कोरडा दुष्काळ पसरला... शेतकरी राजा हैराण झाला असून महाराष्ट्र शासनाने दुष्काळ घोषित केला, परंतु ५ हजाराची मदत दिवाळीपूर्वी देण्याचे घोषित केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतप्त भावना व्यक्त होत आहेत. भोकर मध्ये तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गोविंद बाबा गौड पाटील यांनी सरकारच्या विरोधात जनमताची भावना व्यक्त करण्यासाठी आपल्या गळ्यात फलक लावले होते. त्यावर लिहिण्यात आले होते... मुख्यमंत्री साहेब आम्हाला ५ हजाराची भीक नको, आत्महत्या करण्याची परवानगी द्या... या अनोख्या आंदोलनामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.चालू वर्षाच्या खरीप हंगामात अत्यल्प पाऊस पडल्यामुळे कापूस, सोयाबीन, ज्वारी, तूर, उडीद, मुग अशी पिके हातची गेली त्यामुळे बळीराजा हैरान झाला. आर्थिक संकटात सापडला विरोधी पक्षाकडून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत देण्याची मागणी होत आहे. भोकर मध्ये देखील काँग्रेस कमिटीच्या वतीने २७ ऑक्टोबर रोजी सरकारच्या धोरणा विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात आले. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा पुतळा जाळून जोडे मारू आंदोलन करण्यात आले शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रु. मदत देण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनात भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष यांनी आपल्या गळ्यात फलक अडकवून स्पष्ट शब्दात लिहिले होते मुख्यमंत्री साहेब आम्हाला ५ हजाराची भीक नको आत्महत्या करण्याची परवानगी द्या... या अतिशय संवेदनशील वाक्याने शेतकऱ्यांच्या तीव्र भावना व्यक्त झाल्या आणि सरकारचे शेतकऱ्या प्रति असलेली अनास्था दिसून आली.

आरोग्यमंत्री ना.प्रकाश आबिटकर दोन दिवस नांदेड दौऱ्यावर

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर हे दि. १ व २ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते विविध आरोग्य संस्थांची पाहणी, रुग्णकल्याण समित्यांच्या बैठका, दुष्काळग्रस्त भागाची पाहणी तसेच शेतकरी व आरोग्य विभागातील पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

रविवार,दि.१ नोव्हेंबर रोजी रात्री १ वा. मंत्री प्रकाश आबिटकर यांचे नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात आगमन व मुक्काम होईल. स.७.३० वा.ते मोटारीने उपजिल्हा रुग्णालय, हिमायतनगर येथे प्रयाण करतील. स.९ वा.रुग्णालयाची पाहणी व रुग्णकल्याण समितीची बैठक होईल. सकाळी ९.३० वा. हिमायतनगर तालुक्यातील वाळकेवाडी व देरेगाव तांडा येथील दुष्काळग्रस्त क्षेत्राची पाहणी करून ते शेतकऱ्यांशी संवाद साधतील.सकाळी १० वाजता ते नांदेड येथील जिल्हा महिला व बाल रुग्णालयाकडे प्रयाण करतील. स.११.३० वाजता रुग्णालयात आगमनानंतर पाहणी, आढावा व रुग्णकल्याण समितीच्या बैठकीस उपस्थित राहतील. दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत सर्व आरोग्य समित्यांचे पदाधिकारी व अधिकारी यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे आरोग्य संवाद साधतील. दु. १ ते ५ या वेळेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वाडी बुद्रुक येथे आयोजित ग्रामीण रुग्णालय व इतर विकास-कामांच्या लोकार्पण सोहळ्यास ते उपस्थित राहतील. सायं.५ ते ७ या वेळेत लोहा तालुक्यातील आरोग्य संस्थांना भेटी देतील. त्यानंतर नांदेड शहरातील विविध आरोग्य संस्था तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची पाहणी करून लाभार्थ्यांशी संवाद साधतील. रात्री ८.३० वा. नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतील. सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वा.मंत्री प्रकाश आबिटकर हे नांदेड येथून हिंगोली जिल्ह्यातील वसमतकडे प्रयाण करतील.

सागवानाची कत्तल करुन वनजमीन बळकावण्याचा प्रयत्न

दयाळ धानोरा येथे वनविकास महामंडळाची कारवाई



किनवट/प्रतिनिधी-वनविकास महामंडळाच्या दयाळ धानोरा येथील कक्ष क्र.२७१ मधील राष्ट्रीय वन संपत्तीच्या सागवान वृक्षांची विल्हेवाट लाऊन अतिक्रमीत जमिन बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या दयाळ धानोरा येथील जयसिंग मांगिलाल राठोड (वय वर्ष ५८) या शेतकऱ्यांवर वन परिक्षेत्राधिकारी एस.एन.चोले यांनी कारवाई केलीय. हे एकच प्रकरण आहे की, याची व्याप्ती वाढलेली आहे याचा शोध घेणे प्रशासनासमोर एक आव्हान ठरले आहे.

शिवणी वनविकास महामंडळाच्या दयाळ धानोरा येथील राखीव जंगलात जीवंत सागवान झाडांची प्रचंड प्रमाणात तोड करून जंगलातील जमीन शेतीयोग्य केल्याची माहिती वनविकास महामंडळाच्या शिवणी येथील वनपरिक्षेत्राधिकारी एस. एन. चोले यांना मिळाली आणि त्यांनी कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह जायमोक्यावर जाऊन झाडं तुटीचा पंचनामा करून कारवाई केलीय. किनवट तालुक्यात वनविकास महामंडळाच्या अखत्यारीतील पंधरा हजार हेक्टरच्या आसपास जंगलीक्षेत्र असून वनविभागा (प्रादेशिक) चे बावन हजार हेक्टरच्या आसपास जंगलीक्षेत्र आहे. ते सुरक्षित आहे की, अशीच अतिक्रमणाची कोरणी लावलीय ?, हे पहाण्यासाठी प्रशासन सजग राहण्याची अनेकांनी गरज व्यक्तविलीय.

शस्त्रक्रियेनंतर माजी आ.भाई गुरुनाथराव कुरुडे यांची प्रकृती स्थिर



कंधार/प्रतिनिधी-शेकापचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांनी वयाच्या ९५ व्या वर्षी मेंदूवरील अत्यंत जोखमीच्या शस्त्रक्रियेला यशस्वीपणे तोंड दिले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. नांदेड येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी केलेल्या शस्त्रक्रियेनंतर पुढील उपचारांसाठी त्यांना हैदराबाद येथे हलविण्यात आले. तेथे पुनर्वसनासह उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह स्नेही आणि चाहत्यांचा ओघ सुरू आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, माजी आमदार व खासदार दिवंगत डॉ. भाई केशवराव धोंडगे यांचे निकटचे सहकारी आणि मित्र म्हणून भाई गुरुनाथराव कुरूडे यांची विशेष ओळख आहे. २४ जुलै २०२६ रोजी त्यांना अशक्तपणा व दम लागण्याचा त्रास जाणवू लागल्याने डॉ. महेश तळेगावकर यांच्याकडे नेण्यात आले. डॉ. राठी यांच्या सल्ल्यानुसार दुर्गा डायग्नोस्टिक सेंटर येथे सीटी स्कॅन करण्यात आला. तपासणीत मेंदूत रक्तस्राव (ब्रेन हॅमरेज) झाल्याचे निदान झाले. त्यानंतर मारोती पाटील बोरगावे, ड. पुरुषोत्तमभाऊ धोंडगे व कुटुंबीयांच्या सहकार्याने त्यांना यशोसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉ. ऋतुराज जाधव यांनी आव्हानात्मक परिस्थितीत मेंदूवरील शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा होत असताना त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग अर्थात न्यूमोनियाचा त्रास उद्भवला. त्यामुळे ९ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांना पुढील उपचारांसाठी हैदराबाद येथील जुबली हिल्समधील अपोलो रुग्णालयात हलविण्यात आले. २२ सप्टेंबरपासून पुनर्वसन व पुढील उपचारांसाठी अपोलोच्या 'आपोकोस रिहॅबिलिटेशन हॉस्पिटल' येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. प्रा. वैजनाथराव कुरूडे, वैभव कुरूडे, ॲड. दिलीप कुरूडे आणि सूर्यकांत कावळे हे उपचार तर निलेश गायकवाड देखभालीची जबाबदारी सांभाळत आहेत.

आशुतोष दीक्षित हवाई दलाचे नवीन प्रमुख

नवी दिल्ली : हवाई दल प्रमुख, एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांना तीन अधिकृत निरोप समारंभांद्वारे निरोप देण्यात आला. ज्यामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आयोजित केलेल्या समारंभाचाही समावेश होता. त्यांच्या कार्यकाळातील शेवटच्या दिवशी म्हणजे आज (३१ ऑक्टोबर) त्यांना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देऊन निरोप देण्यात आला. यानतंर एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांनी भारतीय हवाई दलाचे नवीन प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला.

उनकेश्वर मंदिर वृद्धाश्रमात रंगली अनोखी दिवाळी

मांडवी/प्रतिनिधी-दिवाळी सणाचे औचित्य साधून समाजातील उपेक्षित आणि गरजू घटकांपर्यंत आनंदाचा प्रकाश पोहोचवण्याच्या उद्देशाने, भाजपा नेते दिनेश मोहन रुणवाल यांच्या वतीने उनकेश्वर येथील वृद्धाश्रमात वृद्ध आजी-आजोबांना नवीन कपडे आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या स्तुत्य आणि संवेदनशील उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील माता-पित्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद उमलला.

वयोमानानुसार आणि वेगवेगळ्या परिस्थितीमुळे कुटुंबापासून दूर राहणाऱ्या या वृद्धांना ऐन दिवाळीत सणाचा आनंद घेता यावा, यासाठी दिनेश मोहन रुणवाल यांनी पुढाकार घेतला. याप्रसंगी वृद्धाश्रमातील लक्ष्मण आगीरकर, पुजारी रमेश दुलवार, राधाकृष्ण कणाके, अजय वगलवार, गजानन मंत्रीवार, लक्ष्मण नेताम, बापूराव कुडमते, लक्ष्मण कणाटे, दत्ता चटकेलिवार, अजय मोरे, वंदना आगीरकर, लक्ष्मीबाई आगिरकर, कुलाबाई आगीरकर, रुक्मिणीबाई आगीरकर, राधा काळे, पंचफुला काळे, बेबी बाई गेडाम आणि कमलबाई वगलवार या सर्व वृद्ध माता-पित्यांना त्यांच्या आवडीनुसार नवीन वस्त्रे आणि दिवाळी फराळ भेट देण्यात आला. नवीन कपडे हाती पडताच अनेक वृद्धांचे डोळे पाणावले आणि त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले.या कार्यक्रमाला भाजपाचे अमोल राठोड, गणेश तगडपेलीवार, विकास चव्हाण, गजानन जाधव, आशु जैसवाल आणि शैलेश नीलकंठवार गजानन राठोड प्रामुख्याने उपस्थित होते.

तीन हजाराची लाच घेतल्या प्रकरणी तलाठ्याला दोन वर्षाचा कारावास

भोकर जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

भोकर/प्रतिनिधी-आईच्या नावे खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार करून सातबारा अभिलेखात नोंद करण्यासाठी ३ हजार रुपयाची लाच घेणाऱ्या खडकी बाजार ता. हिमायतनगर येथील तलाठी संजय गजानन मेहुणकर यास भोकर अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने २ वर्षाचा सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

हिमायतनगर तालुक्यातील खडकी बाजारचे तलाठी संजय गजानन मेहुणकर याने तक्रारदार विठ्ठल काशिनाथ नरखेडे राहणार खडकी तालुका हिमायतनगर यांचेकडून त्यांच्या आईच्या नावे खरेदी केलेल्या शेत जमिनीचा फेरफार करून सातबारा अभिलेखात नोंद घेण्यासाठी ३ हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती. २५ मे २०१५ रोजी ही रक्कम पंचासमक्ष स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांनी रंगेहात पकडून अटक करून गुन्हा दाखल केला होता. भोकर अतिरिक्त सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल झाल्यानंतर ३० ऑक्टोबर २०२६ रोजी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम यांनी आरोपीस दोन वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या प्रकरणी सरकार पक्षाच्या वतीने ड. अनुराधा डावकरे यांनी काम पाहिले. तपास अधिकारी तत्कालीन पोलीस निरीक्षक गणपत राहीरे लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड, पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक अनिता दिनकर, कोर्ट अमलदार वैशाली पुंडगे यांनी काम पाहिले.

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
Civil M.A.No.1635/2026
CNR Number : MHND020031472026

अर्जदार : १) जिजाबाई पती गंगाधर ढोंगडे (जिजाबाई वडील पिराजी जोगदंड) वय : ७५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, रा.जुना कौठा, बुद्ध विहाराजवळ, कौठा, सिडको, नांदेड, महाराष्ट्र-४३१६०३, २) अरुणा पती माणिक हाटगळे (अरुणा वडील पिराजी जोगदंड) वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, रा.कल्याणनगर, तरोडा बु.नांदेड, महाराष्ट्र-४३१६०५, ३) विजयाबाई पती देवराव कंधारे (विजयाबाई वडील पिराजी जोगदंड) वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी, रा.मु.बोरगाव तेलंग, पो.राहाटी बु. जि.नांदेड, महाराष्ट्र-४३१६०२, ४) शंकर वडील पिराजी जोगदंड वय : ५७ वर्षे, व्यवसाय : शेती, रा.मु.पो.मारळक बु., ता.नांदेड, जि.नांदेड, महाराष्ट्र-४३१६०५, ५) बळीराम वडील पिराजी जोगदंड वय : ५० वर्षे, व्यवसाय : शेती, रा.मु.पो.मारळक बु. ता.नांदेड, जि.नांदेड, महाराष्ट्र-४३१६०५, ६) सुनीता पती उत्तम सोनटक्के (सुनीता वडील पिराजी जोगदंड) वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, रा.मु.पो.डोंगरकडा, ता.मळमनुरी, जि.हिंगोली, महाराष्ट्र-४३१७०१.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळविण्याकरिता अर्ज

ज्या अर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार हे मृत पिराजी संभाजी जोगदंड यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर पिराजी संभाजी जोगदंड यांचा दिनांक २८/०५/१९८८ रोजी मृत्यू झाला आहे.

वर नमूद अर्जदाराशिवाय इतर कोणतीही व्यक्ती कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०९/१२/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,नांदेड

"आदेशावरुन"
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्या.क.स्तर,नांदेड

जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
दि.कि.अर्ज (आर.जे.ई) क्र.१६९५/२०२६
अनिता डोंगरे व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. अनिता भ्र.अंगद डोंगरे, वय : ४० वर्ष, व्यवसाय : गृहीणी, २. अक्षरा पि.अंगत डोंगरे, वय : १५ वर्ष, व्यवसाय : शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क्र.१, ३. अर्पिता पि.अंगद डोंगरे, वय : ८ वर्ष, व्यवसाय : शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क्र.१, सर्व रा.भगवान नगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २ व नुसार वारसा प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. मयत अंगद पि.मारोतीराव डोंगरे यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ह्या मुली आहेत. मयत अंगद पि.मारोतीराव डोंगरे यांचा मृत्यु दिनांक ३०/०५/२०२६ रोजी झाला.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा.न्यायालयात अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १५/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर,नांदेड

नरसी परिसरात गुटखा बंदी केवळ कागदावरच

नरसी/प्रतिनिधी-नरसी परिसरात प्रतिबंधित गुटख्याची विक्री सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत असून, शासनाच्या गुटखा बंदीच्या आदेशाला हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. गुटखा विक्रीवर बंदी असतानाही प्रत्यक्षात या बंदीची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नसल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गुटख्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणा नेमक्या काय करत आहेत? प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही? प्रशासनाच्या दुर्लक्षामुळेच हा व्यवसाय फोफावत आहे का, असे सवाल उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे, तरुण पिढीच्या आरोग्याशी खेळ सुरू असताना संबंधित विभागांनी गप्प का बसावे? केवळ अधूनमधून तपासणी करून चालणार नाही, तर गुटखा विक्रीच्या मुळापर्यंत जाऊन पुरवठादार आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवरील कारवाई सोबतच लोकल क्राईम ब्रँच, पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच पोलीस महानिरीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकांनीही रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अचानक छापे टाकावेत आणि भरारी पथके तैनात करून प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. रामतीर्थ पोलीस प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून गुटखा विक्रीचे जाळे उद्ध्वस्त करावे. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता गुटख्याचा पुरवठा करणाऱ्यांचाही शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

पान १ वरुन माकडछाप,कुत्रा,सरडा...भाजप...

आणखी धार दिली.या दोघांमधील वादात भाजपचे नेते आणि राज्यमंत्री पंकज भोयर यांनीही भूमिका मांडली आहे. रवींद्र धंगेकर यांना शिवसेनेने समज द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे हा वाद केवळ दोन नेत्यांपुरता मर्यादित न राहता महायुतीतील दोन्ही पक्षांच्या संबंधांवरही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत.दरम्यान, ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय चर्चेला नवे वळण मिळाले आहे. भाजप आणि शिवसेनेतील या वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत समन्वयाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दोन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर उघडपणे टीका करत असताना वरिष्ठ नेतृत्वाकडून अद्याप ठोस सार्वजनिक हस्तक्षेप झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे या वादावर पडद्यामागे चर्चा सुरू आहे का, दोन्ही पक्षांतील नाराजी दूर करण्यासाठी प्रयत्न होणार का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.सत्तेत एकत्र असतानाही दोन्ही पक्षांतील नेत्यांमध्ये वारंवार होणारे मतभेद आणि वैयक्तिक टीकेमुळे महायुतीच्या एकजुटीबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. 'तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना' अशी दोन्ही पक्षांची राजकीय कोंडी झाली आहे का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

विकासकामांवरून आरोप-प्रत्यारोप;...

त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सातत्य राखणे महत्त्वाचे आहे. चौकशीअंती वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असा विश्वास व्यक्त करत शहरातील नागरिक सर्व घडामोडींकडे सजगपणे पाहत असल्याचे नगराध्यक्षांनी नमूद केले. त्यामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माहूरच्या विकासकामांचा मुद्दा आणि त्यावरून सुरू असलेले आरोप-प्रत्यारोप राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४